**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाकरिता विभाग प्रमुख व प्रादेशिक कार्यालय प्रमुख घोषित करण्याबबत.**

**महाराष्ट्र शासन**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

शासन निर्णय क्र. एमएसआरएलएम २०१२/ प्र.क्र. १९२ / योजना -३

२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई, दिनांक: ११ सप्टेंबर, २०१२

**वाचा :** शासन निर्णय क्रमांक: एनआरएलएम -२०११/प्र.क्र.१९६/योजना-३, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ दिनांक १८ जुलै, २०११.

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाने स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात रुपांतर करुन त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्य शासनाने दि.१८ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान स्वरुपात राज्यात राबविण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. या अभियानाची अंमलबजावणी करण्याकरिता राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांची सोसायटी रजिस्ट्रेशन अॅक्ट, १८६० मधील तरतुदीनुसार स्थापना करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या निधीमधुन खर्च करण्यासाठी विभाग प्रमुख तसेच प्रादेशिक कार्यालय प्रमुख घोषित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्न्ती अभियाना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या निधीमधुन खर्च करण्यासाठी श्री. श्रावण हर्डीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विभाग प्रमुख व श्रीमती लीना बनसोड, अतिरिक्त संचालक यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख घोषित करण्यात येत आहे.

सदर निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-विअप्र १००८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दिनांक १५ मे, २००९ मधील भाग पहिला, उप विभाग - एक मधील अनुक्रमांक १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१२०९१३१३१६५६१२०१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अनिल काळे)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,
राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष
आवक क्रमांक ११०८
आवक दिनांक २२ / १० / २०१२
टेबल क्रमांक Admin

अति. संचालक

प्रत,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव.

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

D:\0Converted files\NRLM\MSRLM.rtf26

३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,

४) मा. मंत्री ग्रामविकास, कृषि, पशुसंवर्धन, जलसंधारण, कामगार, शिक्षण, उद्योग, महिला व बालविकास,आरोग्य,वित्त, नियोजन,सामाजिक न्याय व आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव,

५) मा. राज्यमंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव,

६) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव,

७) सचिव, नियोजन/वित्त/आदिवासी विकास/सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) महालेखापाल (लेखा परिक्षण), मुंबई/ नागपूर ,

९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

१०) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे,

११) वित्त विभाग (कोषागारे/विनियम),

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई,

१३) अतिरिक्त संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई,

१४) निवड नस्ती.

E:MSRLM27